# —: प्रेस नोट:—

## अरूण एकनाथ मराठे, वय 57 वर्षे, पद अकाऊन्ट ऑफीसर, नगर परिषद वर्धा यांचेविरुध्द 10000/— रुपये लाचेची मागणी करून स्विकारल्यावरून गुन्हा दाखल

तक्रारदार हे वर्धा येथील रहीवाशी असुन सिव्हील कॉन्ट्रक्टर आहे. तक्रारदार यांनी नगर परिषद वर्धा येथील स्ट्रीट लाईट मेंटनन्स चे काम केले असुन सदर कामाचे माहे नोव्हेंबर महिण्याचे 2,44,939/— रू बिल प्रलंबित होते. सदर बिलबाबत तक्रारदार यांनी अरूण एकनाथ मराठे, अकाऊन्ट ऑफीसर, नगर परिषद वर्धा यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी प्रलंबित बिलाचे धनादेश काढुन देण्याकरिता तक्रारदारास 20000/—रू लाचेची मागणी केली. अरूण एकनाथ मराठे यांनी मागणी केलेली लाचरक्कम देण्याची मुळीच इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी त्यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वर्धा येथे तक्रार नोंदविली.

प्राप्त तक्रारीवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वर्धा तर्फे पडताळणी करून दि. 15/12/2017 रोजी सापळा कारवाई आयोजित करण्यात आली. सापळा कारवाई दरम्यान अरूण एकनाथ मराठे, अकाऊन्ट ऑफीसर, नगर परिषद वर्धा यांनी 20,000/— रू. लाचेची मागणी करुन पहिला हप्ता म्हणुन 10000/—रू लाच रक्कम स्विकारली. यावरून आरोपी विरूध्द् पो.स्टे. वर्धा शहर येथे कलम 7,13(1)(ड) सहकलम 13(2) ला. प्र. का. 1988 अन्वये गुन्हा नोंद करण्यात येत आहे.

ॲन्टी करप्शन ब्युरो तर्फे नागरीकाना आवाहन करण्यात येते, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी ईसम लाचेची मागणी करीत असल्यास कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा.

SP ACB NAGPUR 7040222221
LANDLINE NO 0712/2561520
TOLL NO 1064
Website: www.acbmaharashtra.gov.in
Mobile app: www.acbmaharashtra.net
Facebook page: www.facebook.com/MaharashtraACB
Whatsapp: 9930997700

(रोशन यादव)
वाचक पोलीस उप अधिक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो नागपूर
मो.नं. ९९२३३५५२३९